# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय.

"वनवर्धन", प्रधान डाकघर कार्यालयासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

☏ कार्यालय (०२३१) २६५३६३२ फॅक्स - २६५९२३३

E-mail - ccftkolhapur@gmail.com


---

सूचना क्रमांक - मुवसंको/कक्ष-४-३/आस्था/पदभरती-२०१६/४१९८/२०१६-१७ दि. २५ ऑक्टोबर २०१६.

## वनरक्षक पदाकरीता उमेदवारांना सूचना

प्रादेशिक निवड समिती, कोल्हापूर वनवृत्त मार्फत वनरक्षक पदासाठी Online प्राप्त अर्जातील माहिती व इतर अटी /शर्तीनुसार तात्पुरती उमेदवारांची पात्रता यादी www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

वनरक्षक पदासाठी प्रसिध्द झालेल्या यादीमधील उमेदवारांची शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चाळणी चाचणी (पुरुष ५ कि.मी./महिला ३ कि.मी. अंतर अर्ध्या तासांत पार करणे) **दिनांक ५.११.२०१६ ते १४.११.२०१६ या** कालावधीमध्ये वेळापत्रकानुसार (Time Table) **पंचतारांकित एमआयडीसी, कागल, जि.कोल्हापूर** येथील **"भूखंड क्र.टी-२५ लगतच्या अंतर्गत रस्त्यापासून भूखंड क्र.बी-७१ मे.जयअंबे वैष्णव स्टील प्रा.लि. जवळ चौपदरी रस्त्यास वळण घेऊन पुढे पट्टणकोडोलीकडे जाणा-या चौपदरी रस्त्याची पूर्वबाजू "** येथे घेण्यांत येणार आहे.

प्रसिध्द करण्यांत आलेल्या यादीमधील सर्व उमेदवारांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत.

१. उमेदवारांनी महाऑनलाईन चे संकेतस्थळावर ऑनलाईनद्धारे भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांना शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चाळणी चाचणी परीक्षेकरीता तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देण्यांत येत आहे.

२. उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये भरलेली माहिती चुकीची, खोटी अथवा भरती प्रक्रियेच्या विहीत निकषानुसार नसलेचे आढळून आल्यास त्या त्या टप्प्यावर उमेदवारांना निवड प्रक्रियेमधून बाद करण्यांत येईल.

**५. ज्या उमेदवारांकडे जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली विहीत शैक्षणिक पात्रता नाही, त्या** उमेदवारांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी दिनांक ५.११.२०१६ ते १४.११.२०१६ या कालावधीमध्ये घेण्यांत येणा-या शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चाळणी चाचणीकरीता उपस्थित राहू नये. **असे उमेदवार सदर चाळणीसाठी उपस्थित राहून त्या त्या प्रवर्गामध्ये तयार करण्यांत येणा-या १:३ प्रमाणाचे लघुयादीमध्ये धावलेल्या वेळेनुसार प्रथम टप्प्यामध्ये जरी समाविष्ठ झाले तरी, त्यांच्या मूळ कागदपत्राच्या तपासणीवेळी ते बाद ठरणार आहेत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

कोल्हापूर
दिनांक २५ ऑक्टोबर २०१६

स्वाक्षरी/-
(ए.एम.अंजनकर)
सदस्य सचिव
प्रादेशिक निवड समिती तथा
उपवनसंरक्षक, सातारा.

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय।

"वनवर्धन", प्रधान डाकघर कार्यालयासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

☎ कार्यालय (०२३१) २६५३६३२, निवास - २६५३६३४ फॅक्स - २६५९२३३

E-mail - ccftkolhapur@gmail.com


---

सूचना क्रमांक - मुवसंको/कक्ष-४-३/आस्था/पदभरती-२०१६/ ४१६७ /२०१६-१७ दि. २५ ऑक्टोंबर २०१६

## वनरक्षक पदाकरीता उमेदवारांना सूचना

प्रादेशिक निवड समिती, कोल्हापूर वृत्त मार्फत वनरक्षक संवर्गातील २०१६ मधील रिक्त पदासाठी महाऑनलाईन च्या संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन अर्ज मागवून पात्र झालेल्या उमेदवारांची शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चाळणी चाचणी (पुरुष ५ कि.मी./महिला ३ कि.मी. अंतर अर्ध्या तासात पार करणे) दिनांक ५.११.२०१६ ते १४.११.२०१६ **या कालावधीमध्ये** विहीत केलेल्या वेळापत्रकानुसार **पंचतारांकित एमआयडीसी, कागल, जि.कोल्हापूर** येथील **"भूखंड क्र.टी-२५ लगतच्या अंतर्गत रस्त्यापासून भूखंड क्र.बी-७१ मे.जयअंबे वैष्णव स्टील प्रा.लि. जवळ चौपदरी रस्त्यास वळण घेऊन पुढे पट्टणकोडोलीकडे जाणा-या चौपदरी रस्त्याची पूर्वबाजू "** येथे घेण्यांत येणार आहे.

शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चाळणी चाचणीकरीता उमेदवारांनी **खालील बाबींची** नोंद घ्यावी.

१. **उमेदवारांना महाऑनलाईन संकेतस्थळामार्फत उपलब्ध करुन देण्यांत येणारे प्रवेशपत्र संबंधीत उमेदवारांनी संकेतस्थळावरुन download करुन घेऊन ते धावण्याच्या चाळणी चाचणीच्या वेळी सोबत आणावेत. तसेच प्रवेशपत्राची एक छायांकित प्रतसुध्दा सोबत आणावी.**

२. **धावण्याच्या चाळणी चाचणीच्या दिवशी उमेदवारांनी विहीत ओळखपत्र/दस्ताऐवज व प्रवेशपत्रासह पंचतारांकित एमआयडीसी, कागल, जि.कोल्हापूर** येथील **"भूखंड क्र.टी-२५ लगतच्या अंतर्गत रस्त्यापासून भूखंड क्र.बी-७१ मे.जयअंबे वैष्णव स्टील प्रा.लि. जवळ चौपदरी रस्त्यास वळण घेऊन पुढे पट्टणकोडोलीकडे जाणा-या चौपदरी रस्त्याची पूर्वबाजू " येथे त्यांना निश्चित करुन दिलेल्या दिनांकास व बॅचमध्ये उपस्थित राहण्यांचे आहे. निश्चित करुन देण्यांत आलेल्या बॅचचे एक तास अगोदर संबंधीत उमेदवारांनी उपस्थित रहावे. जेणेकरुन उमेदवारांना त्याचवेळी वनविभागामार्फत चेस्ट क्रमांक उपलब्ध करुन देण्यात येतील. निश्चित करुन देण्यांत आलेल्या दिनांकास व बॅचकरीता उमेदवार उपस्थित न राहिल्यास त्यास कोणत्याही परिस्थितीमध्ये दिनांक अथवा बॅचची वेळ बदलून दिली जाणार नाही, व त्याची उमेदवारी आपोआप त्याच टप्प्यावर रद्द करण्यांत येईल, याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.**

**स्वाक्षरी/-**

कोल्हापूर
दिनांक २५ ऑक्टोबर,२०१६.

(ए.एम.अंजनकर)
सदस्य सचिव
प्रादेशिक निवड समिती तथा
उपवनसंरक्षक, सातारा.

# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय.

"वनवर्धन", प्रधान डाकघर कार्यालयासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

☎ कार्यालय (०२३१) २६५३६३२, निवास - २६५३६३४ फॅक्स - २६५९२३३

E-mail - ccftkolhapur@gmail.com


---

सूचना क्रमांक - मुवसंको/कक्ष-४-३/आस्था/पदभरती-२०१६/ ४१८५/२०१६-१७ दि. २५ ऑक्टोबर,२०१६.

## वनरक्षक पदाकरीता उमेदवारांना सूचना

प्रादेशिक निवड समिती, कोल्हापूर वनवृत्त मार्फत वनरक्षक पदासाठी Online प्राप्त अर्जातील माहिती व इतर अटी व शर्तीनुसार तात्पुरती उमेदवारांची पात्रता यादी www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. वनरक्षक पदासाठी पात्र झालेल्या उमेदवारांची शारिरीक स्पर्धात्मक चाळणी चाचणी (पुरुष ५ कि.मी./महिला ३ कि.मी. अंतर अर्ध्या तासांत पार करणे) **दिनांक ५.११.२०१६ ते १४.११.२०१६ या कालावधीमध्ये** वेळापत्रकानुसार (Time Table) **पंचतारांकित एमआयडीसी, कागल, जि.कोल्हापूर** येथील **"भूखंड क्र.टी-२५ लगतच्या अंतर्गत रस्त्यापासून भूखंड क्र.बी-७१ मे.जयअंबे वैष्णव स्टील प्रा.लि. जवळ चौपदरी रस्त्यास वळण घेऊन पुढे पट्टणकोडोलीकडे जाणा-या चौपदरी रस्त्याची पूर्वबाजू "** येथे घेण्यांत येणार आहे. तरी उमेदवारांनी महाऑनलाईनचे संकेतस्थळावरुन प्राप्त केलेल्या स्वत:च्या प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेस उपरोक्त ठिकाणी बॅचच्या नियोजित वेळेपूर्वी एक तास अगोदर हजर रहावे. वनरक्षक पदासाठी पात्र उमेदवारांना चाळणी चाचणीच्या दिनांकादिवशी व बॅचच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर वनविभागामार्फत चेस्ट क्रमांक उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरचे चेस्ट क्रमांक उमेदवारांनी सेफ्टी पिनद्वारे छातीवर लावण्यांचे आहेत. उमेदवारांनी खालील दस्ताऐवज स्पर्धात्मक चाचणीच्या वेळी (दिनांक ५.११.२०१६ ते १४.११.२०१६) आणणे बंधनकारक आहे.

(अ) उमेदवाराचे वचनपत्र व पालकाने द्यावयाचे वचनपत्र.

(ब) उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र व पालकाचे सहमती पत्र.

(क) वैद्यकीय प्रमाणपत्र (शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचे)

(ड) लहान कुटूंबासंबंधी प्रतिज्ञापत्र.

(इ) विहीत केलेल ओळखपत्र फोटो व स्वाक्षरीसह

वरीलप्रमाणे प्रतिज्ञापत्रे/प्रमाणपत्रे/ ओळखपत्राचा नमुना www.kolhapurforest.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जर उमेदवारांनी वरीलप्रमाणे मूळ दस्ताऐवज आणले नाहीत तर, शारिरीक स्पर्धात्मक चाळणी चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

(ए.एम.अंजनकर)

सदस्य सचिव

प्रादेशिक निवड समिती, कोल्हापूर वृत्त

तथा उपवनसंरक्षक सातारा

## कोल्हापूर वनवृत्त - वनरक्षक भरती प्रक्रिया सन २०१६.

## ओळखपत्र

१. उमेदवारांचा अर्ज /चेस्ट क्रमांक KOP | | | | | |

ऑनलाईनद्वारे अर्जामध्ये अपलोड केलेले अलीकडील कालावधीचे छायाचित्र

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव

(आडनांव) ------------------

(वडिलांचे / पतीचे नांव) ------------------

स्वतं:चे नांव ------------------

उमेदवाराची स्वाक्षरी

## उमेदवाराचे द्यावयाचे वचनपत्र

प्रादेशिक निवड समिती, कोल्हापूर मार्फत वनरक्षक भरती २०१६ मध्ये मी खालील सही करणार वचनपत्र लिहून देतो/देते की, वनरक्षक पदभरती २०१६ मध्ये मी उमेदवार म्हणून आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियेचा भाग म्हणून शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चाळणी चाचणीमध्ये ५कि.मी. अंतर (पुरुष उमेदवारास)/ ३ कि.मी. अंतर (महिला उमेदवारास) ३० मिनीटामध्ये पूर्ण करावयाच्या चाळणी चाचणी मध्ये स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहू चाळणी चाचणी करीता मी शारिरीक दृष्टया सक्षम आहे आणि त्या संबंधात शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. उपरोक्त शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चाळणी चाचणी दरम्यान माझी शारिरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास यास शासन जबाबदार राहणार नाही.

करीता वचनपत्र लिहून देत आहे.

स्थळ -

दिनांक - उमेदवाराची स्वाक्षरी

पूर्ण नांव ------------------------------------------

पत्ता ------------------------------------------

## पालकाने द्यावयाचे वचनपत्र

प्रादेशिक निवड समिती, कोल्हापूर मार्फत वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६ करीता माझा पाल्य -------------------------------------------------- रा.---------------------------- ता.----------------- जि.---------------------- याने शारिरीक क्षमता स्पर्धात्मक चाळणी चाचणी (धावणे) (पुरुष ५ कि.मी./महिला ३ कि.मी.) ३० मिनीटामध्ये पूर्ण करणेकरीता दिलेले वचनपत्रास मी सहमत आहे.

स्थळ -

दिनांक - पालकाची स्वाक्षरी

पूर्ण नांव ------------------------------------------

पत्ता ------------------------------------------

# लहान कुटूंबासंबंधी प्रतिज्ञापत्र

**नमूना - अ**

**(नियम - ४)**

मी श्री / श्रीमती / कुमारी -------------------------------------------------------- श्री -------------------------- यांचा /यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय --------- वर्ष -------राहणार ------------------------------- याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी -------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ---------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असतील तर दिनांक २८-३-२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

स्थळ :-

**अर्जदाराची स्वाक्षरी**

**नांव:-**

## उमेदवारांचे प्रतिज्ञापत्र

(वनरक्षक पदाकरीता)

प्रमाणित करतो /करते की, वर नमद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या वनरक्षक पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व शारीरीक पात्रता इत्यादी माझ्याकडे आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी सादर करीत आहे.

मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते की, अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली नोकरी गमावण्यास मी बाध्य राहील व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

नांव :--------------------------

## पालकाचे सहमीपत्र

माझा पाल्य ---------------------------------------- याने वरीलप्रमाणे दिलेल्या प्रतिज्ञापत्रास माझी सहमती आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

पालकाची स्वाक्षरी

नांव :--------------------------

# वैद्यकीय प्रमाणपत्र
## (शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचे)

प्रमाणपत्र क्रमांक -

दिनांक / /२०१६

फोटो

प्रमाणित करण्यांत येते की, श्री.---------------------------------------- रा.------------- ता.-------------- जि.-------------- यांची दिनांक ---------------- रोजी वैद्यकीय तपासणी केली असता वनरक्षक या नव्याने भरावयाच्या पदाकरीता असलेली शारिरीक क्षमता चाळणी चाचणी पुरुष उमेदवाराकरीता ५ कि.मी./ महिला उमेदवाराकरीता ३ कि.मी. अंतर हे ३० मिनीटामध्ये पूर्ण करणे याकरीता शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम आहेत. तसेच संबंधिताची उंची --------- सें.मी., छाती गोलाई (न फुगविता)----------- सें.मी., छाती गोलाई (फुगवून)-------- सें.मी., वजन -------- कि.ग्रॅ.------ व नेत्रदृष्टी --------- सदोष / दोष विरहित (दुरदृष्टी/निकटदृष्टी/रातआंधळेपणा/ तिरळेपणा या बाबीवर) आहे.

स्थळ -

दिनांक -

शासकीय वैद्यकीय अधिकारी

(सही/शिक्का)